# महाराष्ट्र शासन

संकीर्ण-२०१२/(१७९/१२)/विशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०१२

प्रति,
कुलगुरु,
सर्व अकृषी विद्यापीठे

**विषय : एम.आय.टी.स्कुल ऑफ गव्हर्नमेंट, पुणे या संस्थेद्वारे आयोजित केलेल्या तिस-या विद्यार्थी परिषदेसाठी विद्यार्थी प्रतिनिधींचे नामनिर्देशन करणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस असे कळविण्याचे मला निर्देश आहे की, एम.आय.टी.स्कुल ऑफ गव्हर्नमेंट, पुणे या संस्थेद्वारे दिनांक १० ते १२ जानेवारी २०१३ या कालावधीत एम.आय.टी स्कुल ऑफ गव्हर्नमेंट, पुणे येथे तिसरी भारतीय विद्यार्थी परिषद आयोजित करण्यात येणार आहे. सध्या विद्यार्थी परिषदेसाठी अकृषी विद्यापीठातील तसेच अकृषी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थी कौन्सील मधील प्रत्येकी दोन इच्छुक विद्यार्थी प्रतिनिधींचे नामनिर्देशन करण्याची विनंती संस्थेने शासनास केली आहे.

यास्तव आपणांस विनंती आहे की, एम.आय.टी स्कुल ऑफ गव्हर्नमेंट, पुणे या संस्थेद्वारे आयोजित केलेल्या तिस-या भारतीय विद्यार्थी परिषदेसाठी आपल्या विद्यापीठाचे तसेच संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी कौन्सील मधील प्रत्येकी दोन इच्छुक विद्यार्थी प्रतिनिधींचे नामनिर्देशन करण्याबाबतचा निर्णय आपल्या स्तरावरुन घेऊन त्याप्रमाणे सर्व संबंधीत महाविद्यालयांनी आवश्यकती कार्यवाही करावी असे निर्देश आपल्याशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांना देण्यात यावे.

आपला

(रा.गो.जाधव)
शासनाचे सह सचिव